मा.उपविभागीय अधिकारी,नागपूर शहर तथा सक्षम प्राधिकारी (MPID) यांचे कार्यालातील

नमुना 6

(नियम 12(2)(ब) पाहा)

## अटकावून ठेवलेल्या जप्त जंगम मालमत्तेच्या (पशुधन) विक्रिची उदघोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी रविराज इन्व्हेस्टमेंट आणि स्ट्रॅटेजिस फर्म चे संचालक श्री राजेश जोशी व इतर रा. नागपूर यांनी ठेविदारांकडुन स्वीकारलेल्या ठेवी मुदतपूर्तीनंतर परत करण्यास कसूर केल्यामूळे गुंतवणूकदारांनी गुंतवीलेली रक्कम अदा करण्यास महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधिल) हितसंबंधी संरक्षण अधिनियम 1999 चे कलम 4 व 5 अन्वये वसूली करण्यासाठी शासनाकडुन या वित्तीय संस्थेची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे आणि त्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाने गृहविभागाचे पत्र क्र.ईओएफ–0115/प्र.क्र.35/ पोल-13, दि.16 जुन, 2017 अन्वये दि. 20 जुन, 2018 रोजी शासनाचे राजपत्रात प्रसीध्द केलेली आहे आणि सदर अधिसूचना दि. 16 जुन, 2017 मधिल खालील अनुसूचीत दर्शविलेली वित्तीय संस्थेचे किंवा संचालकांचे नावाची जंगम मालमत्ता (पशुधन) मा. दिनेश सुराणा, विशेष न्यायाधिश (MPID) तथा ASJ-2, जिल्हा न्यायालय,नागपूर यांनी प्रकरण क्र. M.C.A. No.2954/2017 मधील आदेश दि. 07/08/2018 नूसार महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधी अधिनियम 1999 चे नियम 8, अन्वये चौकशीअंती आदेश पारीत करुन जप्त पशुधनापैकी शिल्लक पशुधन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची परवानगी दिलेली आहे.

त्याअर्थी या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की खालील जप्त मालमत्तेचा पशुधन जाहीर लिलाव उपविभागीय अधिकारी, नागपूर शहर तथा सक्षम प्राधिकारी, एमपीआयडी यांचे कडुन रकाना **क्र.6** मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी व दिनांकास दुपारी 12.30 वाजता ठेवण्यात आलेला आहे. जप्त पशुधन बोलीत भाग घेऊ ईच्छीणा-या व्यक्ती / संस्था यांना सदर मालमत्तेबाबत (पशुधन) दर्शविलेल्या रकाणा **क्र.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाहण्यास उपलब्ध आहेत..

पशुधन जशी आहेत त्यास्थितीत जाहीर लिलावामध्ये विक्री करण्यात येईल व महत्तम बोलीधारकांना लिलाव मंजूर केल्यानंतर व आवश्यक रक्कम भरणा केल्यावर हस्तांतरीत केली जातील

| अ. क्र. | जनावरांचा प्रकार | प्रजात | लिंग | वय | पशुधन ज्या ठिकाणी आहे ते ठिकाण व लिलाव दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | गाय (वासरु 2 महीन्याचे) | एच.एफ जर्सी | मादी | 9-10 वर्ष | श्री. मनोज जाऊळकर यांचे मौजा बोरगांव (कोंढाळी) ता. काटोल जि.नागपूर येथील फार्म (शेतामधिल गोठा) मध्ये ठेवलेली आहे. **लिलाव तारीख** 14/08/2019 **रोजी दुपारी** 12.30 **वाजता** पासुन |
| 2 | गाय | एच.एफ जर्सी | मादी | 9-10 वर्ष | |
| 3 | गाय | एच.एफ. जर्सी | मादी | 9-10 वर्ष | |
| 4 | गाय | एच.एफ जर्सी | मादी | 9-10 वर्ष | |
| 5 | गाय | एच.एफ जर्सी | मादी | 9-10 वर्ष | |

Competent Authority (MPID) & S.D.M. Nagpur City

### लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

1) सर्व जनावरांचे (पशुधन) वेगवेगळ्या क्रमाने लिलाव घेण्यात येतील.
2) बोलीधारकास बोली बोलण्यासाठी रु.5000/- नोंदणी फी (अनामत रक्कम) भरावी लागेल.
3) यशस्वी महत्तम बोलीधारकास लिलाव रकमेचे 100% रक्कम लिलावानंतर त्याच दिवशी किंवा सक्षम अधिकारी यांनी परवानगी दिल्यास प्रथम धनाकर्ष/ धनादेश प्राप्त करुन 24 तासाचे आत भरावी लागेल. लिलावाची संपूर्ण रक्कम मुदतीत न भरल्यास अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल.
4) वरील अटी व शर्ती शिथील करण्याचा अथवा कोणतेही कारण न देता आवश्यक्तेनूसार लिलावांस,रक्कमेस अंतीम मान्यता देणे किंवा लिलाव रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नागपूर शहर यांनी राखून ठेवले आहे.

माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्यानिशी दिली.
दिनांक :- 07 /08/2019

सक्षम अधिकारी (MPID)
तथा उपविभागीय अधिकारी,
नागपूर शहर

प्रतिलिपी :-

1) मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यास सादर.

2) मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश ASJ-2 जिल्हा न्यायालय नागपूर .

3) सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, काटोल/कळमना नागपूर /कळमेश्वर /सावनेर /खापा /मोहपा यांना माहिती व आवश्यक प्रसिद्धीसाठी अग्रेषित.

4) पशुधन / वैद्यकीय अधिकारी नागपूर यांना माहिती व लिलाव दिनांकास प्रत्यक्ष मौक्यावर हजर राहण्यास अग्रेषित.

5) पोलीस उपायुक्त EOW, गुन्हे विभाग नागपूर यांना महितीस व जप्त पशुधनाबाबत सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यास संबंधीत अधिका-यास लिलावाचे वेळी मौक्यावर हजर ठेवण्याकरीता सस्नेह अग्रेषित.

सक्षम अधिकारी (MPID)
तथा उपविभागीय अधिकारी,
नागपूर शहर